# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ४४१/२०१९**

**तक्रारकर्ता श्री. व्ही. एस. इंगळे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (का.)**
त्रिवेणी संगम, महानगरपालिका शाळा संकुल,
करी रोड रेल्वेस्टेशनजवळ, परेल,
मुंबई -४०० ०१२

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (मध्यवर्ती)**
बृहन्मुंबई महानगरपालिका, शिक्षण विभाग, शिक्षणाधिकारी यांचे कार्यालय,
लखमशी नप्पू, हिंदू कॉलनी, दादर (पू.),
मुंबई - ४०००१४

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २३.१२.२०२४</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. मु.मा.आ. नों.क्र. ४३/२०१८ रा.मा.आ. अपील क्र. १४/२०१९ प्रकरणी आयोगाने दि. १९.०७.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना अहवालाची प्रत १५ दिवसांत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(६) अन्वये नोंदणीकृत टपालातून निशुल्क पुरवावी. अपील निकाली काढण्यात येत आहे."*

उक्त आदेशानुषंगाने तक्रारकर्ता यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. २७.०९.२०१९ रोजी आयोगासमोर तक्रार अर्ज दाखल केला. सदर तक्रारीवर जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (का.) त्रिवेणी संगम, करीरोड, परेल, मुंबई यांच्याकडून आयोगाने दि. ०६.११.२०१९ च्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला. त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (का.) बृहन्मुंबई महानगरपालिका- शिक्षण विभाग, करीरोड, मुंबई यांनी त्यांचा अहवाल दि. १८.११.२०१९ आयोगास सादर केला.

*सुनावणीच्या वेळी* तक्रारकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित असून तक्रारकर्त्याने आयोगास असे सादर केले की, त्यांना हवी असलेली माहिती अप्राप्त आहे.

आयोगाच्या अभिलेखावरील शिक्षण विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचा दि. १८.११.२०१९ रोजीचा अहवाल तक्रारकर्त्यास दाखविण्यात आला. तक्रारकर्त्याने सादर केले की, त्यांना हवी असलेली माहिती याप्रमाणे नाही. त्यांनी नमूद केले की, आयोगाचे १९.०७.२०१९ रोजीच्या आदेशामध्ये असे नमूद होते की, उपशिक्षणाधिकारी (पूर्व उपनगरे)(प्र.) यांचेकडून अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यांना अथोचित उत्तर देण्यात येईल. परंतू, जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर करण्यात आलेला दि.१८.११.२०१९ रोजीचा अहवाल त्याप्रमाणे नाही. कारण की, सदर अहवाल प्रशासकीय अधिकारी (शाळा), एम/ पूर्व विभाग, मुंबई यांचा आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे दि. १९.०७.२०१९ रोजीच्या आदेशाप्रमाणे संबंधितांकडून प्राप्त करुन अहवालाची प्रत तक्रारकर्त्यांस उपलब्ध करुन देणे मान्य केले. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीसह पुन्हा पुढील सुनावणीस उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २७.०१.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

27-12-2024

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २७.१२.२०२४**

निर्गमित
दिनांक 08 JAN 2025

## रामाआ- तक्रार क्र. बीएम- ४४१/२०१९
## तक्रारकर्ता श्री. व्ही. एस. इंगळे
## सुनावणी दिनांक : २७.०१.२०२५ (In continuation of order dt २७.१२.२०२४)

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

या प्रकरणी आयोगाने दिनांक २७.१२.२०२४ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारीत केले होते:

"जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे दिनांक १९.०७.२०१९ रोजीचे आदेशाप्रमाणे संबंधीतांकडून प्राप्त करुन अहवालाची प्रत तक्रारकर्त्यास उपलब्ध करुन देणे मान्य केले. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीसह पुन्हा पुढील सुनावणीस उपस्थि रहावे. पुढील सुनावणी दिनांक २७.०१.२०२५ रोजी घेण्यात येईल."

उक्त आदेशास अनुसरुन आज झालेल्या सुनावणीस तक्रारकर्ते व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा अहवाल दिनांक २४.०१.२०२५ आयोगास सादर केला. तो अभिलेखावर घेण्यात आला. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, त्यांचे अभिलेखात प्रशासकीय अधिकारी (शाळा) एम पूर्व-२ विभाग यांचेकडूनच प्राप्त झालेली कागदपत्रेच उपलब्ध आहेत. आणि सदर कागदपत्रे त्यांनी ०८.०१.२०२५ चे पत्रान्वये तक्रारकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे.

तक्रारकर्त्याने आयोगास सादर केले की आयोगाचे आदेश दिनांक १९.०७.२०१९ मध्ये जन माहिती अधिकारी यांचे असे नमूद केले होते की, त्यांना उपशिक्षणाधिकारी (पूर्व उपनगरे) (प्र) यांचेकडून अहवाल प्राप्त झालेला आहे. परंतू आता त्यांनी जे पेपर उपलब्ध करुन दिलेले आहेत ते त्याप्रमाणे नाहीत.

जन माहिती अधिकारी यांनी असे नमूद केले की, अभिलेखावर उपलब्ध असलेली कागदपत्रे तक्रारकर्त्यांना उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. तसेच अभिलेखावरुन खालीलप्रमाणे वस्तूस्थिती निदर्शनास येते:

१. श्रीम विशाखा विनायक इंगळे यांच्या सेवा अभिलेखानुसार दि.१०.११.२००० व ११.०१.२००७ या कालावधीचे रजेविना अनुपस्थिती रजा (AWL) नमुद असल्याचे दिसून येत आहे.

२) श्रीम विशाखा विनायक इंगळे यांच्या शिक्षा आदेशानुसार दि.०१.०६.२००८ ते १६.१२.२००८ हा कालावधी सेवेत खंड न धरता (AWL) करण्यात आला यास्तव वेतन देय नव्हते. सदर कालावधीतील सन २००६-२००८ या कालावधीचा LTA देय नव्हता.

३) सन २००८-१० या कालावधीचा LTA देण्यात आला आहे.

४) सन २०१२-१४ या कालावधीत LTA दिल्याची नोंद सेवा अभिलेखात दिसून येत नाही.

..२/-

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारकर्त्यांना माहिती देण्यात आली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : ३०.०१.२०२५**

30-1-2025

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

State Information Commission * Greater Mumbai *

राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई